# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी – 22620601/22690602/22641150/22641151 फॅक्स - 2269 2102.
E-Mail: desk2a@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in


क्रमांक: २३/एडीएम/ नोंदणी प्रक्रिया/२०१८/ 9308
दिनांक : 10 OCT 2018

प्रति,
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई,पुणे,नाशिक,औरंगाबाद,अमरावती,नागपूर

विषय : शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशयादी पडताळणी करणेबाबत प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर करावयाची नोंदणी प्रक्रिया

संदर्भ : १) प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे पत्र क्रमांक संकीर्ण / प्र.क्र.१७०/प्रनिप्रा/१२२, दिनांक ५.९.२०१८
२) प्रवेश नियामक प्राधिकरणाचे पत्र क्रमांक संकीर्ण / प्र.क्र.१७०/प्रनिप्रा/१९७, दिनांक ९.१०.२०१८

वरील विषयाबाबत कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या पडताळणी प्रक्रियेकरिता प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या www.safalta.org या संकेतस्थळाच्या लिंकवर खाजगी व विनाअनुदानीत व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थांनी नोंदणी करणे अनिवार्य असल्याचे प्राधिकरणाने कळविलेले होते. दिनांक ३०.९.२०१८ पर्यंत नोंदणी प्रक्रियेसाठी अंतिम मुदत दिलेली होती. तथापि अद्यापही काही संस्थांनी नोंदणी केली नसल्याचे आढळून आल्यामुळे प्रवेश नियामक प्राधिकरणाने एक विशेष बाब म्हणून नोंदणी करण्यासाठी सदर पोर्टल दिनांक १०.१०.२०१८ ते १४.१०.२०१८ मध्यरात्रीपर्यंत खुले करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानंतर कोणत्याही प्रकारची मुदतवाढ देण्यात येणार नाही असे प्रवेश नियामक प्राधिकरणाने संदर्भाधीन दिनांक ९.१०.२०१८ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

प्राधिकरणाने कळविल्यानुसार नोंदणी दरम्यान येणा-या अडचणींकरिता दूरध्वनी क्रमांक ०२०-६७६३५९९९ येथे मार्गदर्शन उपलब्ध आहे.

उपरोक्त बाब आपल्या अधिपत्याखालील सर्व व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांच्या निदर्शनास आणण्यात यावी.

(प्रमोद नाईक)
सहसंचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

---

पृ.क्र.तंशिस/प्राकाना/शैवि/2018/ 3379
सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, नागपूर
दिनांक:- 10 OCT 2018

प्रति,
प्राचार्य,
सर्व पदवी, पदव्युत्तर पदवी संस्था,
नागपूर विभाग, नागपूर

यांना कळविण्यात येते की, उपरोक्त पत्रात नमुद केल्यानुसार शै.वर्ष 2018-19 मधील प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या http://www.safalta.org या संकेतस्थळावर नोंदणी करण्याकरीता दि. 10/10/2018 ते 14/10/2018 पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. ज्या संस्थेने अद्यापपर्यंत नोंदणी केलेली नाही त्यांनी विहित मुदतीत नोंदणी करण्यात यावी व यानंतर मुदतवाढ देण्यात योणार नाही याबाबत नोंद घ्यावी.

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

महाराष्ट्र शासन
प्रवेश नियामक प्राधिकरण
८वा मजला, न्यु. एक्सलसियर बिल्डींग,
ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१
दूरध्वनी : ०२२ - २२०१ ६१५९
वेबसाईट : http://www.maha-ara.org
ईमेल : maharashtra.ara@gmail.com

महत्वाचे/कालमर्यादा/ई-मेलद्वारे
क्रमांकः संकीर्ण/प्र.क्र.१७०/प्रनिप्रा/ 198

दिनांक ०९ ऑक्टोबर २०१८

प्रति,
अधिष्ठाता/प्राचार्य,
सर्व खाजगी व विनाअनुदानित,
व्यावसायिक अभ्यासक्रमाची महाविद्यालये,
महाराष्ट्र राज्य

**विषय : शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रवेश प्रक्रियेची पडताळणी करण्याकरीता संस्थेची नोंदणी प्रक्रिया**

संदर्भ १) या कार्यालयाचे पत्र क्र.संकीर्ण/प्र.क्र/१७०/प्रनिप्रा/१२२ दिनांक ०५/०९/२०१८

प्रवेशित विद्यार्थ्यांच्या पडताळणी प्रक्रियेकरीता सर्व खाजगी विनाअनुदानित संस्थांनी प्राधिकरणाच्या **www.safalta.org** या पोर्टलवर संस्थेची नोंदणी करणे अनिवार्य आहे. या करीता सर्व संस्थांना दिनांक ३०/०९/२०१८ पर्यंत मुदत देण्यात आली होती. तथापि अद्यापही काही संस्थांनी आपल्या संस्था/महाविद्यालय नोंदणी केल्याचे दिसून येत नाही. यास्तव एक विशेष बाब म्हणून सदर पोर्टल दिनांक १०/१०/२०१८ ते १४/१०/२०१८ मध्यरात्री पर्यंत नोंदणी करीता खुले करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यानंतर कुठल्याही प्रकारची मुदत वाढ देण्यात येणार नाही याची गंभीरपणे नोंद घ्यावी.

नोंदणी दरम्यान येणाऱ्या अडचणींकरीता दुरध्वनी क्रमांक ०२०-६७६३५९९९ येथे मार्गदर्शन उपलब्ध आहे.

(ए.ई. रायते) भा.प्र.से.
सचिव,
प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त,
राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई.

# GOVERNMENT OF MAHARASHTRA
## ADMISSIONS REGULATING AUTHORITY

8th Floor, New Excelsior Building,
A.K. Nayak Marg, Fort, Near CSMT,
Mumbai – 400 001 (M.S.)

Tel No. : 022 - 2201 6159
Website : http://www.maha-ara.org
E-mail : maharashtra.ara@gmail.com

No.170/ARA/ 199

Date :09 October 2018

To,
All Nodal Officers & Exam Co-ordinators

The College/Course registration has been re-opened on Admission Regulating Authority Portal (**www.safalta.org**) from 10th Oct 2018 to 14th Oct 2018 midnight. You are now requested to inform all the colleges/Institutions under your Jurisdiction to register their Institutions, if not already registered.

This is final opportunity given to all the Institutes, hence urgency.

**(A E Rayate) IAS**
**Secretary,**
**Admission Regulating Authority,**
**Mumbai**